**प्रेसनोट दि.२६/०४/२०१९**
**चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन,पुणे**
**चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन यांनी एक गावठी पिस्टल व एक काडतुस हस्तगत केले कामगिरीबाबत..**

---

चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये दिनांक २२/०४/२०१९ रोजी पेट्रोलिंग करीत असताना पोलीस नाईक विशाल साबळे यांना त्याचे बातमीदारामार्फ़त बातमी मिळाली की,इसम नामे ,इसम नामे ओंकार प्रदिप सुतार रा.मनपा शाळे शेजारी बाणेर गांव पुणे याचेजवळ एक पिस्टल आहे व तो सध्या राजवाडा हॉटेल समोर सोमेश्वरवाडी पाषाण पुणे येथे रोडवर कोणाची तरी वाट बघत थांबला आहे तसेच त्याने अंगामध्ये पांढऱ्या रंगाचा शर्ट त्यावर वेगवेगळया रंगामध्ये डिझाईन आहे व कपाळावर गंध लावला आहे अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने सदरची बातमी मिळताच सदर महिती मा.अप्पर पोलीस आयुक्त श्री सुनिल फुलारी पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर,मा.पोलीस उप आयुक्त,श्री प्रसाद अक्कानवरू,परिमंडळ ४ पुणे शहर,मा.सहा.पोलीस आयुक्त,श्री देवीदास पाटील, खडकी विभाग पुणे शहर यांना देवून त्यांनी केलेल्या सुचना प्रमाणे भास्कर जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्रीमती वैशाली गलांडे पोलीस निरीक्षक गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक श्री संदेश केंजळे,पोलीस उप निरीक्षक तुकाराम फड,कर्मचारी पो.हवा.प्रदिप खळदकर, बाळू गायकवाड,एकनाथ जोशी,मुकूंद तारू,पो.ना.सारस साळवी,विशाल साबळे,पोना प्रकाश आव्हाड,पोना दादासो काळे,संतोष जाधव,अजय गायकवाड व पो.शि.तेजस चोपडे, ज्ञानेश्वर मुळे,अमर शेख यांचे टिम ने इसम नामे ओंकार प्रदिप सुतार वय २३ वर्षे रा.दत्तमंदिराचे जवळ,मनपा शाळे शेजारी बाणेर गांव पुणे.मुळ पत्ता- डुल्या मारूती चौक,राधाकृष्ण बिल्डींग,दुसरा मजला,गणेश पेठ पुणे. यास राजवाडा हॉटेल समोर सोमेश्वरवाडी पुणे येथे रोडवर सापळा रचून ताब्यात घेवून त्याची झडती घेतली असता त्याचेजवळ कि.रू.२५,२००/-चे एक लोखंडी गावठी बनावटीचे पिस्टल व एक काडतूस जप्त करण्यात आले आहे.सदर इसमाविरूध्द चतुःश्रृंगी पो.स्टे.गुन्हा रजि.नं.४२८/१९ आर्म ॲक्ट ३(२५),महा.पो.ॲ.क. ३७(१)सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**(भास्कर जाधव)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**चतु:श्रृंगी पो.स्टे.पुणे शहर**